# सोलापूर महानगरपालिका,सोलापूर

इंद्रभुवन आंबेडकर चौक, रेल्वे लाईन्स, सोलापूर ४१३००१
बांधकाम परवाना विभाग, नगर रचना कार्यालय, दुसरा मजला
ई-मेल : adtpsolapur1@gmail.com


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र.ससंनर/बां.प./२३/ ३७४ दि. २२/०६/२०२३

प्रति,

१. कामगार कल्याण जनसंकपर्क अधिकारी
   सोलापूर महानगरपालिका, सोलापूर

२. संगणक प्रोग्रामर
   संगणक विभाग, सो.म.पा.

**विषय :-** मान्सुन पुर्व जाहिर प्रसिध्दीकरण करणे बाबत.
**संदर्भ :-** मा. आयुक्त यांचे दि.२१/०६/२०२३ रोजीची मान्यता.

उपरोक्त विषयास अनुसरुन पावसाळ्याच्या अनुषंगाने शहरातील कमकुवत, जीर्ण तथा धोकादायक इमारती तसेच इलेक्ट्रीक पोल व झाडे पडून होणाऱ्या जिवित व वित्तहानी होऊ नये म्हणून शहरातील नागरीकांमध्ये सुरक्षितेतच्या अनुषंगाने घ्यावयाच्या काळजी बाबत आवाहन करणे बाबतचे प्रसिध्दीकरणाची प्रत सोबत जोडली असून मा.आयुक्त यांचे मान्यतेची प्रत सोबत जोडली आहे. तरी सदर प्रसिध्दीकरण स्थानिक वृत्तपत्रात करणेबाबत पुढील कार्यवाही करण्यात यावी.
सोबत - मान्यतेची प्रत व जाहिर प्रसिध्दीकरणाचा मसुदा

२२/६/२०२३

उप अभियंता, नगर रचना
सोलापूर महानगरपालिका, सोलापूर

आवक .क्रं. ३५८ दि.22/6/२०२३
संगणक विभाग

E:\draft\Pangal Sir 2023\dhokadayak

# सोलापूर महानगरपालिका,सोलापूर

इंद्रभुवन आंबेडकर चौक, रेल्वे लाईन्स, सोलापूर ४१३००१
बांधकाम परवाना विभाग, नगर रचना कार्यालय, दुसरा मजला
ई-मेल : adtpsolapur1@gmail.com


जा.क्र.ससंनर/बां.प./२३/ ३१४ दि२२/०६/२०२३

मा. सादर

**विषय :-** मान्सुन पुर्व जाहिर प्रसिध्दीकरण करणे बाबत.

उपरोक्त विषयास अनुसरुन पावसाळ्याच्या अनुषंगाने शहरातील कमकुवत, जीर्ण तथा धोकादायक इमारती तसेच इलेक्ट्रीक पोल व झाडे पडून होणाऱ्या जिवित व वित्तहानी होऊ नये म्हणून शहरातील नागरीकांमध्ये सुरक्षितेतच्या अनुषंगाने घ्यावयाच्या काळजी बाबत आवाहन करणे बाबतचे प्रसिध्दीकरणाचा मसुदा सोबत जोडलेला आहे. सदर मसुदयावर स्वाक्षरी होऊन सदरचे प्रसिध्दीकरण स्थानिक वृत्तपत्रात प्रसिध्द करणेकामी व प्रसिध्दीकरणाचा खर्च "दौंडया व जाहिराती" सदरी खर्ची टाकणेस मान्यता मिळणेस विनंती आहे. तसेच सदरचे प्रसिध्दीकरण म.न.पा.चे वेबसाईटवर देखील प्रसिध्दीकरण करणेस मान्यता मिळणेस विनंती आहे.

सोबत - प्रसिध्दीकरणाचा मसुदा

SKkamble
सहा.संचालक, नगर रचना
सोलापूर महानगरपालिका, सोलापूर

21.06.2023
मा. आयुक्त,
सोलापूर महानगरपालिका, सोलापूर

कार्यवाहीस्तव,
संगणक प्रोग्रामर
संगणक विभाग.

E:\draft\Pangal Sir 2023\dhokadayak

# जाहिर प्रसिध्दीकरण

पावसाळयाच्या दिवसांत वादळीवारे व पावसामुळे शहरातील जुनी आणि कुमकुवत घरे / चाळी इमारती पावसाच्या माऱ्यामुळे पडण्याची शक्यता असते. तसेच झाडे, इलेक्ट्रीकल पोल इत्यादी कोसळण्याची शक्यता असते. अशा धोक्यामुळे जिवीत व वित्त हानी संभवते. सदर बाबी टाळणेसाठी खालीलप्रमाणे खबरदारी नागरीकांनी घ्यावी.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ अन्वये आपल्या इमारतीची वेळोवेळी तज्ञ इंजिनिअरकडून पाहणी करवून घेऊन इमारत अथवा इमारतीचा प्रत्येक भाग सुस्थितीत राखण्याची जबाबदारी संबंधीत घर मालकांनी / भोगवटदारांनी पाहणीनुसार आवश्यक पाडकाम स्वत: करुन घेणे अथवा दुरुस्त्या महानगरपालिकेची पुर्व परवानगी घेऊन करणे आवश्यक आहे. तसेच धोकादायक इमारती मधील रहिवाशांनी अशा इमारतीमधून स्थलांतरीत होऊन सुरक्षित ठिकाणी रहिवास करणे बाबत देखील याद्वारे आवाहन करण्यात येत आहे.

यापूर्वी महानगरपालिकेकडून शहरातील ३० वर्षापेक्षा जास्त कालावधी झालेल्या इमारतीची रचनात्मकं स्थैर्य प्रमाणपत्र (Structural Stability) महानगरपालिकेकडील नोंदणीकृत रचनाकार अभियंता यांचेकडून तपासून घेवून त्यांचे प्रमाणपत्र सादर करणेबाबत दैनिक वृत्तपत्रामध्ये वेळोवेळी जाहिर प्रसिध्दीकरण देण्यात आलेले आहे. नोंदणीकृत स्ट्रक्चरल इंजिनिअर याची यादी बांधकाम परवानगी विभागाकडे नागरीकांकरीता उपलब्ध करण्यात आलेली आहे.

एखाद्या इमारतीचा भाग अचानक कोसळल्यास झाडे, पोल, इत्यादी पडल्यास अग्निशामक दल फोन नं.२७४०३६४ व ६८, १०१, नगर अभियंता स्टोअर - ०२१७-२७४०३३५, या कार्यालयांना नागरीकांनी त्वरीत कळवावे.

तरी सर्व घर मालकांनी भोगवटदारांनी व नागरीकांनी पावसाळयात इमारती झाडे व इलेक्ट्रीकल पोल पासून होणारा संभाव्य धोका टाळण्यास आणि जिवीत व वित्तहानी होऊ न देण्यास सोलापूर महानगरपालिकेस सहकार्य करावे.

शीतल तेली-उगले, भा.प्र.से.
आयुक्त,
सोलापूर महानगरपालिका, सोलापूर

E:\draft\Pangal Sir 2023\dhokadayak